# मनस्विनीचे गाणे

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - संगीत कला विहार, संपा.सुधा पटवर्धन,मिरज, फेब्रुवारी, २००५)

मोगूबाई गेल्या! आजारी होत्या, बराच काळ गातही नव्हत्या. पण तरीही अनेकांना अस्वस्थ वाटलं. अध्याय संपला, पुढे काय, असेही!

मोगूबाईविषयी अनेक बाजूंनी आठवणी मनात आल्याखेरीज राहात नाहीत. माझे गुरू पं. गजाननबुवा जोशी. त्यांना विविध गायकी आत्मसात करण्याचे वेड! (केवळ विविध चिजा जमा करून त्यांचे समाधान होत नसे!) जयपूर घराण्याची गायकी शिकण्याचा त्यांना ध्यास लागला. त्यांनी केसरबाईंकडे धाव घेतली. बाईंनी त्यांचा पाहुणचार केला पण नकार दिला (इतकेच नव्हे तर आपल्या बैठकींना त्यांना येऊ देऊ नये असा हुकूम काढला!) मग बुवा मोगूबाईंकडे गेले. त्यांनीही नकार दिला, 'आपण गवई आहात. मी काय शिकवणार आपल्याला' म्हणून! शेवटी बुवांनी कोल्हापूरला बिऱ्हाड हलवले आणि भुर्जीखांकडे तालीम घेतली. पण बुवा नेहमी सांगत, "मोगूबाईंकडे चांगले नकाशे आहेत. त्यांची गाणी चुकवू नको.

मोगूबाईंचा मुलगा उल्हास, मी आर्यन शाळेत असताना वर्गमित्र होता. कधी कधी घरी येई, पण संगीत हा दुवा नसे! पुढे ही भेटला तेव्हा कार्यक्रमांचे निरूपण, आकाशवाणीवर निवेदन कसे करावे याचीच तो चर्चा करी. मला मनात जाणवे संगीत हा व्यवसाय म्हणून घ्यावा न घ्यावा याविषयी घरात दुमत असणार! काळच तसा होता. संगीतकारांच्या मुलाबाळांना संगीत व्यवसाय तितका सन्मान्य वाटत नसे. आपण पदवीधर व्हावे, डॉक्टर व्हावे, इंजिनिअर बनावे असे त्यांचे मनसुबे होते. याला मोगूबाईंचे घर अपवाद नव्हते. संगीतकारांना मिळणारी प्रसिद्धी, त्यांची जनमानसांत असणारी प्रतिमा, कांही संगीतकारांना मिळणारे धन हे सर्व आकर्षक - पण बाहेरच्यांना! अनेक संगीतकारांच्या बाबतीत लागू पडणाऱ्या दोन म्हणी 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे' आणि 'दुरून डोंगर साजरे'. मोगूबाई धनिक नव्हत्या आणि विद्यावंत होऊनही त्यांना काळजीने सोडले नाही. पण त्यांचे मोठेपण असे की प्रापंचिक कुतरओढीचा त्यांनी गायनावर परिणाम होऊ दिला नाही. संगीत हाच व्यवसाय मानणाऱ्यापुढे दोन (आणि दोनच!) मार्ग असतात. लोकांना रूचेल ते सादर करावे, मग आपल्याला काहीही न पटले तरी, किंवा आपल्याला पटेल तेच ज्यांना रूचेल अशाची वाट बघावी. मोगूबाईंनी मानिनीचा मार्ग आपला मानला.

आता दृश्यबदल. सांताक्रूझला एका परिषदेत त्या गायल्या. आधी वाद्यसंगीताचा कार्यक्रम होऊन गेलेला असल्याने रंग जमविणे अवघड. दुपार होऊ घातलेली म्हणजे स्वत:चा रंग असलेले राग मागे पडलेले. अशा वेळी मोगूबाईंनी दोन झपताल सादर केले. पहिला बिलावलचा प्रकार होता आणि दुसरा खट. आवाज तीक्ष्ण, सुरेल, पातळ आणि तरीही गमक भरदार. शब्द व गायन दोहोंचा उच्चार वजनदार. तानाही तशाच. एक-दोन बोलतानांचे प्रकार इतर जयपूर गायकांत न आढळणारे. लयकारी आघातहीन, सूक्ष्म. एकूण गायकीचा परिणाम भव्य वास्तू पाहिल्याचा, वाहवा आल्या न आल्या तरी आपल्या दिमाखात पुढे जाणारे त्यांचे गायन. त्या काळी मान्य झालेल्या वा टाळी घेणाऱ्या कोणत्याही युक्तीचा अवलंब न करणारी त्यांची गायनदृष्टी. तबलजीबरोबर झटापट? नाही! अतितार सप्तकांत जाणे? नाही! भुरभुर फिरणाऱ्या ताना? नाहीत! भावपूर्ण भासणारे हळवे आवाज लावणे? नाही! सर्वसामान्यांना आवडणारे नाट्यगीत, ठुमरी, भजन,गाणे? नाही! आणि तरीही गायनाचा असर होत असे. हा असर झाला याची जाणीव उशिरा होई! गाण्याचा परिणाम चांगला आणि टिकाऊ होई - पण जरा काळ लोटल्यावर ध्यानात येई! आयुर्वेदांतील औषधाच्या गुणासारखे होई!

मोगूबाईंना गायनातील वैचारिक अंगाचे जास्त आकर्षण होते काय? भाव भावना येतात जातात. विचार टिकतो किंवा आपण राहूनही दुसऱ्यास जागा करून देतो म्हणून त्यांची अपूर्वाई निराळी अशी त्यांची साक्ष होती काय? मोगूबाई बऱ्याच जणांना शिकवत असत. कै. वामनराव देशपांडे, कमल तांबे इत्यादी. वामनराव सांगत की मोगूबाई करड्या शिस्तीचे गाणे शिकवत, पण मऊपणे! काय गावे, कसे मांडावे, कल्पना किती वाढवावी याबाबत त्यांची मते ठाम होती आणि शिकवताना या मतांना मुरड घालणे त्यांना मान्य नसे. घराण्याचे शिक्षण ठाम मते असणाऱ्यांनाच देता येते. म्हणून विद्यापीठात गुरू शिष्य पद्धतीने तालीम द्यायची म्हटल्यावर आमचा पहिला प्रयत्न त्यांना आणण्याचा होता, पण त्या संस्थेत बसणाऱ्या नव्हत्या ; स्वत:च एक संस्था होत्या!

एकदा सिडनहॅम कॉलेजचे प्राचार्य ढेकणे यांच्या घरी गाणे होते - मास्टर कृष्णराव यांचे. गाणे ऐकून परत येताना मी मोगूबाईंना विचारले, सांगलीमधील संभारे वैद्यांकडे होणाऱ्या गणेशोत्सवाबद्दल आणि त्यांच्याकडे भारताच्या कानाकोपऱ्यांतून येणाऱ्या कलाकारांबद्दल. सांभारे हे वैद्यराज. मनस्वी, कलाप्रिय, नाडीपरीक्षा, रोगनिदान, औदार्य, लोकसंग्रह सर्वच काही अफाट कीर्तीकर! उस्ताद रहिमत खाँ, उस्ताद अल्लादिया खाँ, उस्ताद अब्दुल करीम खाँ, गायनाचार्य बाळकृष्ण बुवा... सर्वांची हजेरी तिथे लागत असे. याविषयी बोलणे झाल्यावर मोगूबाई किंचित थांबून म्हणाल्या, "अशोक, आमच्या गुरूजनांना इतरांची गाणी ऐकायची कशी ते चांगले कळे. आमचे खाँसाहेब आणि रहिमत खाँ एकमेकांची गाणी समोर बसून आणि डोळे मिटून ऐकत - लक्षपूर्वक. आजची मंडळी फक्त स्वत:चेच गाणे ऐकतात, नाही का?" त्या आठवणीत बुडल्या आणि मी चूप झालो.

काय सुचवायचे असावे त्यांना? ऐकण्यातूनही शिकता येते, असे? खूप ऐकावे, पण आपलेच गावे असे? दुसऱ्या कुणासारखे गाऊन कलाकार मोठा होऊ शकत नाही, असे? मला प्रश्न त्यांना विचारायला जमले नाही. तसे करायला आवडले असते, कारण त्यांनी शब्दाआड न लपता उत्तरे दिली असती.

एकदा जयपूर- अत्रौलीच्या दुसऱ्या श्रेष्ठ गायिका केसरबाई केरकर यांनी मला फटकारले होते, "हुशार आहात, प्रश्न योग्य विचारता, पण योग्य माणसांना विचारा!"

---